# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/९२८
दिनांक : १२.०८.२०२४

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व पालघर जिल्हांतील महाविद्यालये.

**विषय : रासेयो स्वयंसेवकांनी युवकांच्या सहभागाने आणि पुढाकाराने जल संवर्धन (YEWS) अभियांनातील उपक्रमांची अमंलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र.६६/ रासेयो कक्ष, दिनांक १० सप्टेंबर, २०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासन आणि युनिसेफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांना जलवायु (क्लायमेट) साक्षरता आणि नैसर्गिक संसाधन संवर्धनाचे महत्व विशेषत: जल संवर्धन, जैवविविधता पुनर्संचय इत्यादी विषयांवर कार्य करण्यासाठी सक्षम करण्यात येत आहे. जलवायू साक्षरता आणि कृती उपक्रमांतर्गत ''युवकांच्या सहभागाने आणि पुढाकराने जल संवर्धन'' (YEWS) अभियान राबविले जात आहे. ज्यामध्ये १५-२९ वयोगटातील युवकांना जल संवर्धन उपक्रम शिकवण्याचे आणि कौशल्य प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २८ दशलक्ष घनमीटर पाणी सरंक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानात कमी खर्चात, सहज करण्याजोग्या दैनंदिन पाणी बचतीच्या पध्दती अवलंबल्या जात आहेत. हा उपक्रम सध्या महाराष्ट्रातील १३ जिल्हांमध्ये सदर उपक्रम सुरू असून यामध्ये मुंबई विद्यापीठ अंतर्गत ४ जिल्हयामध्ये (मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे व पालघर) सदर उपक्रम राबविला जात आहे.

राज्य सल्लागार मंडळाच्या वार्षिक कृती आराखड्यातील निर्णयाच्या आधारे आणि यूजीसीच्या जल संवर्धनाशी संबंधित पत्राचा संदर्भ देऊन YEWS कार्यक्रम रासेयोच्या वार्षिक कृती आराखडयात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधीत जिल्हांतील महाविद्यालयीन रासेयो एककांनी तात्काळ या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. यासाठी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

१. **रासेयो जिल्हा समन्वयक** :

- YEWS कार्यक्रमाबाबत सर्व रासेयो अधिकाऱ्यांचे ऑनलाईन किंवा शक्य तिथे ऑफलाइन प्रशिक्षण देणे.
- रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना सहकार्य करणे.
- मासिक प्रगती अहवाल संकलन करणे आणि विद्यापीठातील रासेयो संचालकांना पाठवणे (जोडपत्र/संलग्नक १)

**२. रासेयो कार्यक्रम अधिकारी:**

रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांना YEWS अभियानातील खालील उपक्रम पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे

- प्रत्येक रासेयो स्वयंसेवकाने जलवायू कृतीसाठी 'युवक नेतृत्व' हा https://www/mahayouthnet.in/ येथे उपलब्ध असलेला ऑनलाइन स्व-गतीने शिकवला जाणारा कोर्स पूर्ण करणे.
- प्रत्येक रासेयो स्वयंसेवकाने ''व्हाय वेस्ट YEWS (Why Waste YEWS)" ॲप डाउनलोड करून किमान १०,००० लिटरचे पाणी बचतीची नोंद करणे ग्रामीण विकास विभाग आणि पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग राबवित असलेल्या स्वच्छ माझे अंगण उपक्रमांतर्गत शोष खड्डे, पाझर खड्डे, परसबाग बांधणी उपक्रमांत युवक सहभागी होऊ शकतात. तसेच युवक MNREGA अंतर्गत शोष खड्डे आणि पाणी संवर्धनाच्या जाणीव जागृती उपक्रमांत सहभागी होऊ शकतात.
- मासिक अहवाल रासेयो जिल्हा समन्वयक व संचालकांना पाठवणे (जोडपत्र/संलग्नक २)
- रासेयो युनिट स्तरावरील मासिक अहवाल संकलित करणे (जोडपत्र/संलग्नक २.१).

कृपया वरील प्रमाणे उपक्रम राबविण्यात यावेत.

**आपला**

**सुशील शिंदे**

**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**सोबत** : संदर्भ पत्र.